**कृपया प्रसिध्दीसाठी** **15 जून 2012**

# कुष्ठपीडितांचे राष्ट्रपतींना साकडे

**नवी दिल्ली, शुक्रवार :** कुष्ठपीडितांना कलंकरहित, सन्मानाचे जीवन जगता यावे यासाठी कुष्ठपीडितांच्या समस्यांचे निराकरण करण्याची सूचना पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांना करण्याचे आश्वासन राष्ट्रपती श्रीमती प्रतिभा पाटील यांनी आज नवी दिल्ली येथे दिले. त्याचप्रमाणे देशातून कुष्ठरोगाचे संपूर्ण निर्मूलन व्हावे यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जावेत असेही त्या पंतप्रधानांना सांगणार आहेत. माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक, कुष्ठपीडितांच्या नॅशनल फोरमचे अध्यक्ष पद्मश्री डॉ. पी. के गोपाल, इंटरनॅशनल लेप्रसी युनियनचे अध्यक्ष डॉ. शरदचंद्र गोखले व कार्याध्यक्ष श्री. आर. एच. बेलवडी, हिंद कुष्ठ निवारण संघाचे श्री. उदय ठकार व नॅशनल फोरमचे न्यासी श्री. वेणुगोपाल यांच्या शिष्टमंडळाला राष्ट्रपतींनी हे आश्वासन दिले.

या विषयाची पार्श्वभूमी सांगताना श्री. राम नाईक म्हणाले, ‘‘कुष्ठपीडितांच्या समस्या व त्यांच्या सशक्तीकरणासाठी मी या क्षेत्रात काम करणा-या काही प्रमुख समाजसेवक, कुष्ठपीडितांच्या वसाहतींचे प्रतिनिधी यांच्यासह राज्यसभेकडे 5 डिसेंबर 2007 रोजी एक विनंती अर्ज सादर केला होता. राज्यसभेच्या विनंती अर्ज समितीने त्याबाबतचा आपला अहवाल 24 ऑक्टोबर 2008 रोजी दिला. त्यानंतर त्यावर विविध खात्यांनी आपापली उत्तरे दिली, अनेक मंत्रालयांशी चर्चा झाली व त्यानंतर विनंती अर्ज समितीने आपला कारवाई अहवाल (ॲक्शन टेकन रिपोर्ट) 22 नोव्हेंबर 2010 रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवला. मूळ अहवालात तसेच कारवाई अहवालात कुष्ठपीडितांच्या सशक्तीकरणासाठी विविध शिफारसी केल्या होत्या. ज्यामुळे आम्ही सर्वच समाधानी होतो’’.

‘‘तथापि, त्या शिफारसी वेगवेगळ्या मंत्रालयांशी निगडीत असल्यामुळे त्यांच्या त्वरीत अंमलबजावणीसाठी पंतप्रधानांची भेट घेतली पाहिजे असे आम्हा सर्वांना वाटले. त्यानुसार 1 जानेवारी, 20 जानेवारी, 10 फेब्रुवारी व 9 मार्च 2011 रोजी प्रत्यक्ष चर्चेसाठी वेळ मागणारी पत्रे आम्ही पंतप्रधानांना पाठविली. मात्र संवेदनशून्य पंतप्रधानांनी या पत्रांची साधी दखलही घेतली नाही. त्यामुळेच आम्ही देशातील सर्वोच्च अर्थातच राष्ट्रपतींना साकडे घालण्याचे ठरविले. त्यानुसार आम्ही 14 सप्टेंबर 2011 रोजी महामहीम राष्ट्रपतींना निवेदन सादर केले आणि त्यांनीही त्यात लक्ष घालण्याचे आश्वासन दिले’’.

‘‘गेल्या नऊ महिन्यांत कोणत्याही मंत्रालयात याबाबत काही हालचाल सुरु असल्याचे आम्हांला जाणवले नाही. भरीस भर म्हणून 13 मार्च 2012 रोजी आरोग्य मंत्र्यांनी राज्यसभेत एका प्रश्नाला उत्तर देताना मोठीच धक्कादायक माहिती दिली. सरकारने 2005 मध्ये देशातून कुष्ठरोगाचे निर्मूलन झाल्याचा दावा केला होता. परंतु प्रत्यक्षात वर्ष 2010 मध्ये देशात 1,26,800 नवे कुष्ठरुग्ण आढळून आल्याचे आरोग्य

..2..

मंत्र्यांनी सांगितले. जगभरात त्यावर्षी नव्याने लक्षात आलेले कुष्ठरुग्ण 2,28,474 होते. म्हणजेच एकट्या भारतातच नव्याने आढळलेल्या कुष्ठरुग्णांचे प्रमाण 55.5 टक्के आहे. अद्याप लक्षात न आलेले कुष्ठरुग्ण तर आणखी वेगळेच. या सर्व बाबींचे गांभीर्य लक्षात घेऊन आणि बारावी पंचवार्षिक योजना (2012 - 2017) आता पूर्ण होत आहे हे लक्षात घेऊन आम्ही पुन्हा एकदा राष्ट्रपतींना साकडे घालण्याचा निर्णय घेतला. पुन्हा एकदा या विषयाची दखल घ्यावी या आमच्या विनंतीला सकारात्मक प्रतिसाद देत पंतप्रधानांना योग्य त्या सूचना करण्याचे राष्ट्रपतींनी आश्वासन दिले आहे,'' अशी माहिती श्री. राम नाईक यांनी दिली.

कुष्ठपीडितांच्यावतीने राष्ट्रपतींकडे केलेल्या मागण्यांपैकी महत्त्वाच्या मागण्या पुढीलप्रमाणे :- 1) कुष्ठपीडितांचे सामाजिक - आर्थिक सर्वांगिण सशक्तीकरण करणारी योजना तयार करणे, 2) मूळ विनंती अर्जात नमुद केलेल्या 16 विविध कायद्यांमध्ये परिवर्तन, 3) कुष्ठपीडितांचा उदरनिर्वाह भत्ता प्रति महिना रु. 2000 /- पर्यंत वाढविणे व सर्व राज्यांमध्ये समान निर्वाह भत्ता देणे, 4) दारिद्र्य रेषेखालील गरीबांना व अपंगाना मिळणा-या सर्व आर्थिक व सामाजिक सवलती कुष्ठपीडितांनाही देणे, 5) कुष्ठपीडितांच्या वसाहतींना सर्व नागरी सुविधा देणे, 6) कुष्ठपीडितांच्या मुलांच्या उच्च शिक्षणाची सोय करणे व त्यासाठी त्यांना शिष्यवृत्त्या देणे, 7) कुष्ठपीडितांच्या उत्पादनांवरील व्हॅट काढून टाकणे, 8) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य कार्यक्रमांतर्गत राज्य व जिल्हा स्तरीय समित्यांवर कुष्ठपीडितांना प्रतिनिधीत्व देणे, तसेच राष्ट्रीय पुनर्वसन मंडळावरही कुष्ठपीडितांना संधी देणे, 9) कुष्ठ रोगात वाढ झाली किंवा काय यासंबंधी देशभरात नव्याने सर्वेक्षण करणे, 10) कुष्ठसेवेमध्ये कुष्ठपीडितांचा सहभाग वाढावा यासाठी जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी करणे.

राष्ट्रपतींशी झालेल्या चर्चेबाबत आम्ही समाधानी असून आता या मागण्या पूर्ण होतील अशी आम्हांला आशा आहे, असेही श्री. नाईक अखेरीस म्हणाले.

**(कार्यालय सचिव)**